**नि.फौ.के. नं. ८५/२०२३**
**महाराष्ट्र शासन वि.प्रथमेश सोगम व इतर**
**निशाण क्र. ४३**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – सतिश श्रीपाद लाड,
**वय** – ४७ वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**राहणार** – तुळसणी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून</u>–**

**०१.** दिनांक ०४/०८/२०२३ रोजी पोलीसांनी मला देवरुख पोलीस ठाणे येथे बोलावले होते. त्यावेळी माझ्या सोबत अशोक बने हे हजर होते.

**०२.** पोलीसांनी फोनवरुन आम्हाला आरोपी नागोबा देवस्थानमधील घंटा चोरल्याचे सांगत आहेत असे सांगितले. पोलीस ठाण्यात आल्यानंतर आरोपींना नाव विचारले असता त्यांनी प्रथमेश रमेश सोगम व त्याची पत्नी साक्षी उर्फ नेहा पवार असे सांगितले.

**०३.** त्यानंतर आरोपींनी सांगीतल्यानुसा र आम्ही देवरुख–रत्नागिरी, रस्त्यावरील तुळसणी येथील नागोबा देवस्थान येथे गेलो. तेथे मध्यभागी एक ॲन्गल व त्याला घंटा लटकण्याची जागा होती. तेथून घंटा चोरल्याचे आरोपींनी सांगितले. त्यानंतर पोलीसांच्या गाडीमध्ये आम्ही बसून देवरुख येथे आलो. पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. त्यानंतर पोलीसांनी आम्हाला जाण्यास सांगितले.

**०४.** देवरुख पोलीस ठाण्यात आल्यानंतर पोलीसांनी आमच्या सहया घेतल्या होत्या. त्यावेळी मी, अशोक बने, दोन आरोपी व पोलीस कर्मचारी असे आम्ही हजर होतो. मी सहया केलेला पंचनामा मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. (साक्षीदारास *निशाणी ४१* कडील पंचनामा दाखविण्यात आला). त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. त्यानंतर पोलीसांनी घटनास्थळ नकाशा काढला होता. तो दाखविल्यास मी ओळखू शकतो. (साक्षीदारास *निशाणी ४२* कडील घटनास्थळ नकाशा दाखविला). त्यावर माझी सही आहे.

०५. माझ्यासोबत त्यावेळी गाडीतून आलेले दोन आरोपी आज रोजी मला दाखविल्यास मला ओळखता येतील. आज रोजी ते न्यायालयात हजर नाहीत.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास – आरोपी क्र. ०१ व ०२ तर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांच्याकडून सुरु –**

०६. मी नागोबा देवस्थान समितीचा सदस्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी देवरुख पोलीसांशी व्यक्तीशः ओळख नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा संपर्क क्रमांक देवरुख पोलीसांकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे देवरुख पोलीसांनी मला बोलविण्याचा व्यक्तीशः संबंध नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, देवरुख पोलीस ठाण्यात मी कधी आलो त्याची तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व सहया पोलीस ठाणे देवरुख येथेच केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी आधीच मजकूर लिहून ठेवला होता व त्यावर माझी सही घेतली होती. मी पोलीस ठाणे येथे येण्यापूर्वी राहूलवाडी येथील घरीच हजर होतो. ११:३० ते १२:४५ वाजताच्या दरम्यान पोलीसांनी मला बोलाविल्याचे कळाले.

०८. हे म्हणणे खरे आहे की, मी देवस्थान समितीचा सदस्य असल्याने साक्षीदार म्हणून मला पोलीसांनी बोलावले होते. पोलीसांनी बोलाविल्याचे कळालेनंतर मी ०५ मिनीटांच्या आतच घरातून निघालो होतो. आमच्या घरातून गावातील बस थांबा दोन किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर बस थांब्यावरुन देवरुख पोलीस ठाण्यात येण्यास २० मिनीटे लागतात. त्यानंतर अर्धा ते पाऊण तासाने पोलीसांशी माझी भेट झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, भेट झालेवेळी पोलीसांनी माझी सही घेतली होती.

०९. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासात मी कथन केलेला मजकूर देवरुख पोलीसांनी मला सांगीतला होता व त्यानुसार मी तो साक्षीत कथन केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, देवस्थान समितीचे सदस्य असल्याने मी केलेल्या सर्व सहया साक्षीदार म्हणून

केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. ०१ व ०२ तर्फे उलटतपास पूर्ण.**

**आरोपी क्र. ०३ तर्फे विधीज्ञा श्रीमती बी. एस. मुरुडकर यांनी आरोपी क्र. ०१ व ०२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास जशास तसा वाचण्यात यावा अशी तोंडी विनंती केली. विनंती मंजूर.**

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.07 17:47:45 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०७.०७.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 07/07/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 07/07/2025 |
| Evidence uploaded on | :- | 07/07/2025 |